# - महाराष्ट्र शासन -
# महसूल व वन विभाग

क्रमांक - मह.कार्या.1/आस्था-2/आरआर- 653/16.
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली.
दिनांक - 13 ऑगस्ट, 2016.

**जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, सह.जिल्हा निबंधक वर्ग - 1, सांगलीचे आस्थापनेवरील लिपिक टंकलेखक संवर्गातील आणि उपविभागीय कार्यालयांचे आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरतीबाबत जाहिरात.**

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील पत्र क्र.भरती-2016/प्र.क्र.309/ई-7 दिनांक 23 जून, 2016 अन्वये महसूल विभागातील क्षेत्रिय कार्यालयातील लिपीक - टंकलेखक व तलाठी यांची सरळसेवेतील रिक्त असलेली पदे महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-2015/प्र.क्र.41/अर्थ-1दिनांक 02.06.2015, वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-2015/प्र.क्र.64/2015/वित्तीय सुधारणा दिनांक 15.01.2016 व शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रानिमं-1214/289(प्र.क्र.108/14)/13-13, दिनांक 11 मार्च, 2015 मध्ये दिलेल्या निर्देशानुसार भरणेबाबत सुचित करणेत आलेले आहे. त्याअनुषंगाने लिपीक - टंकलेखक व तलाठी या संवर्गातील रिक्त पदे भरतीसाठी पात्र अर्हता धारक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीने **http://sanglicollector.maharecruitment.co.in** या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविणेत येत आहेत.

**जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली व सह.जिल्हा निबंधक वर्ग - 1, सांगलीचे आस्थापनेवरील लिपिक - टंकलेखक संवर्गातील भरावयांच्या पदाचा तपशिल (वेतनश्रेणी - 5200 - 20200 पी. बी. - 1 ग्रेड पे. रू. 1900/-)**

| अ.क्र | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | अंशकालीन 10% | महिला 30% | माजी सैनिक 15% | प्रकल्प ग्रस्त 5% | भुकंप ग्रस्त 2% | अपंग 3% | खेळाडू 5% | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | अ.जा. | 05 | 00 | 03 | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 01 |
| 2 | अ.ज. | 03 | 00 | 00 | 02 | 00 | 00 | 00 | 00 | 01 |
| 3 | वि.जा.अ | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 01 |
| 4 | भ.ज.ब. | 02 | 00 | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 01 |
| 5 | इ.मा.व. | 04 | 00 | 00 | 02 | 00 | 00 | 00 | 01 | 01 |
| 6 | खुला. | 02 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 02 |
| **एकूण** | | **17** | **00** | **04** | **05** | **00** | **00** | **00** | **01** | **07** |

**(सांगली जिल्हयातील एकूण पाच उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील भरावयांच्या पदाचा तपशिल**

**(वेतनश्रेणी - 5200 - 20200 पी.बी. - 1 ग्रेड पे. रू. 2400/-)**

| अ.क्र | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | अंशकालीन 10% | महिला 30% | माजी सैनिक 15% | प्रकल्पग्रस्त 5% | भुकंपग्रस्त 2% | अपंग 3% | खेळाडू 5% | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | अ.जा. | 06 | 01 | 03 | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 01 |
| 2 | अ.ज. | 05 | 00 | 02 | 02 | 00 | 00 | 00 | 00 | 01 |
| 3 | वि.जा.अ. | 01 | 00 | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 |
| 4 | भ.ज.क. | 01 | 00 | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 |
| 5 | भ.ज.ड. | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 01 |
| 6 | इमाव | 06 | 01 | 01 | 01 | 01 | 00 | 00 | 01 | 01 |
| 7 | खुला | 11 | 02 | 01 | 02 | 02 | 01 | 00 | 00 | 03 |
| **एकूण** | | **31** | **04** | **09** | **06** | **03** | **01** | **00** | **01** | **07** |

टिप क्रमांक 1 :- उपरोक्त पदांची संख्या कमी जास्त होणेची शक्यता आहे.

टिप क्रमांक 2 :- लिपीक - टंकलेखक संवर्गाच्या बाबतीत जिल्हाधिकारी कार्यालय, सांगलीचे आस्थापनेवरील 09 पदे आणि सह.जिल्हा निबंधक वर्ग 1 सांगली यांचे आस्थापनेवरील 08 पदे भरणेत येतील. दोन्ही कार्यालयाचे आस्थापनेवरील जात प्रवर्गनिहाय आवश्यक असलेल्या पदांच्या निवडयादीमधील गुणानूक्रमे वरच्या क्रमांकावरील उमेदवारांची निवड जिल्हाधिकारी कार्यालय, सांगलीचे आस्थापनेवर तर खालील उमेदवारांची निवड सह.जिल्हा निबंधक वर्ग 1 सांगली यांचे आस्थापनेवर करणेत येईल.

टिप क्रमांक 3 :- तलाठी संवर्गातील भरावयाच्या पदांचा तपशिल या तक्त्यामधील सामाजिक व समांतर आरक्षणानुसार नमुद केलेली पदे उपविभागीय कार्यालयाचे आस्थापनाकडून स्वतंत्ररित्या प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार दर्शविलेली आहेत. त्यामुळे, उपरोक्त एकूण एकंदर तक्त्यामध्ये आकडेवारीशी समांतर आरक्षणातंर्गत टक्केवारी (%) जुळेलच असे नाही.

**इतर अटी -**

1) समांतर आरक्षणानुसार अपंग, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, खेळाडू, महिला इ. प्रवर्गातील उमेदवारांना देय आलेल्या सवलती देणेत येतील.
2) अंशकालीन कर्मचारी स्वातंत्र सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य उमेदवारांना देय असलेल्या सवलती देणेत येतील.
3) समांतर आरक्षणांतर्गत त्या त्या प्रवर्गासाठी विहित केलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळणेसाठी त्या-त्या प्रवर्गातील उमेदवारांमधून जागा भरणेत येतील.
4) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रं. मकसी-1007/प्र.क्र. 36/ का. 36 दिनांक 10 जुलै 2008 अन्वये महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या 865 गावातील मराठी भाषिक उमेदवारांना संबंधित पदाच्या सेवा भरती नियमातील सर्व अटीची पुर्तता ते करीत असल्यास, त्यांना अर्ज करण्यास परवानगी देणेत आलेली आहे. त्यासाठी संबंधित उमेदवारांकडून ते महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या 865 गावातीलच 15 वर्षे रहिवाशी असल्याबाबतचा त्यांच्या वास्तव्याचा सक्षम प्राधिका-यांचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहिल.
5) समांतर आरक्षणाअंतर्गत आवश्यक जात प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाही तर समांतर आरक्षणातील त्या - त्या जात प्रवर्गासाठी उमेदवारांच्या उपलब्धतेनुसार पर्याप्त संख्येत यादीतील शेवटचे उमेदवार वगळून समाविष्ठ करणेचे अनुषंगाने शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रं. एसआरव्ही-1097/प्र.क्र.31/98/16अ दिनांक 16.03.1999, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग

परिपत्रक क्रं. अंशका 1913/प्र.क्र. 57/2013/16-अ, दिनांक 19 सप्टेंबर 2013 मधील तरतूदी लागू राहतील.

6) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही 1012/प्र.क्र. 16/12/16-अ दिनांक 13 ऑगस्ट 2014 मधील तरतूदी लागू राहतील.
7) सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे तसेच सेवाभरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार सांगली जिल्हा निवड समिती, सांगली स्वतः कडे राखून ठेवीत आहे. भरती प्रक्रिये संदर्भात उद्भवणारे वाद, तक्रारी इत्यादीबाबत सदर समितीचा निर्णय अंतिम राहील.
8) माजी सैनिकाबाबत Government of India, Ministry of personnel P. G. & Pensions (Department of Personnel & Training) No. 36034/5/85- Estt (SCT), New Delhi Dt.27 th Oct. 1986 च्या राजपत्रात सैनिक दलात कार्यरत असताना 1 वर्षा अगोदर माजी सैनिक या पदासाठी अर्ज करता येईल. तसेच तो गुणवत्तेनुसार पात्र ठरल्यास नियुक्तीचे अधिकार हे सांगली जिल्हा निवड समिती सांगली यांना राहतील.

अ) **<u>वयोमर्यादाः</u>** - (**<u>लिपिक - टंकलेखक व तलाठी पदासाठी पात्रता )</u>**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक; एसआरव्ही 2015/प्र.क्र.404/कार्या.12 दिनांक 25 एप्रिल, 2016 नुसार, उमेदवाराचे वय जाहीरात प्रसिध्द केल्याच्या दिनांकाच्या दिवशी किमान 18 वर्षे पुर्ण तर खुल्या प्रवर्गासाठी कमाल 38 वर्षे, व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल 43 वर्षे अशी राहील.

1) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं. पअंक-1009/प्र.क्र.200/2009/16-अ, दिनांक 27.10.2009 नुसार अंशकालीन उमेदवारांसाठी कमाल 46 वर्षे असावे.
2) प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी कमाल वय 45 वर्षे असावे.
3) खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत 5 वर्षे शिथील केली जातील.
4) सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शुध्दीपत्रक दिनांक 20.08.2010 अन्वये माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग 3 व वर्ग 4 मधील पदांसाठी नेमणुकी करीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील.
5) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं. निवक - 2010/प्र.क्र. 08/2010/16 - अ दिनांक 06.10.2010 अन्वये प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन 1991 चे जनगणना कर्मचारी, सन 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील उमेदवारांना जर त्यांना लिपीक - टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली, तर टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून 06 महिने इतक्या कालावधीची मुदत देण्यात येत आहे.
6) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक 06.10.2010 अन्वये अर्ज करणा-या स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य व 1991 चे जनगणना कर्मचा-यांसाठी अर्जदारांचे वय किमान 18 पुर्ण असावे व वय 45 वर्षे पेक्षा जास्त नसावे. तसेच शासन निर्णय क्र. 1097 / प्र.क्र. 77/9716-अ दिनांक 13.03.1998 मधील निकष पुर्ण केलेले असावेत.

शासन निर्णयानुसार जाहीरात प्रसिध्द केल्याच्या दिनांकाचे दिवशी उमेदवाराचे वय उपरोक्त मर्यादेमध्ये असणे आवश्यक आहे.

**ब) <u>शैक्षणिक अर्हताः</u> -**

**<u>लिपीक - टंकलेखक पदासाठी</u> -**

1. किमान अर्हता माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण.

2. टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र मराठी कमीत कमी 30 शब्द प्रती मिनीट किंवा इंग्रजी 40 शब्द प्रती मिनीट परीक्षा उत्तीर्ण असलेले शासन मान्य व्यावसायिक संस्थेचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

3. लिपीक टंकलेखक पदासाठी उमेदवाराने MS - CIT या संगणकीय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तथापि, महाराष्ट्र शासनाकडील माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि. ) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातस- 2012/प्रक्र.277/39 दिनांक 04 फेब्रुवारी, 2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/ माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उतीर्ण झालेल्या कर्मचा-यांने संगणक अर्हता परिक्षा उतीर्ण असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास ते ग्राहय धरणेत येईल. नसल्यास, शासन निर्णय सा.प्र.वि. क्र. प्रशिक्षण 2000 / प्र.क्र. 61/2001/39 दिनांक 19 मार्च, 2003 अन्वये संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून 02 वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहिल.

4. माध्यमिक शालांत परिक्षेत मराठी / हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**क) <u>शैक्षणिक अर्हताः</u> -**

**<u>तलाठी पदांसाठी</u> -**

1. जाहिरातीचे तारखेस ज्यांनी पदवी धारण (Degree Holder) केलेली आहे पदवी म्हणजे संविधानिक विद्यापिठाची पदवी तसेच महाराष्ट्र शासनाने समतुल्य म्हणून जाहीर केलेली अन्य अर्हता.

2. लिपीक टंकलेखक पदासाठी उमेदवाराने MS - CIT या संगणकीय अभयासक्रमाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तथापि, महाराष्ट्र शासनाकडील माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातस- 2012/प्रक्र.277/39 दिनांक 04 फेब्रुवारी, 2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/ माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उतीर्ण झालेल्या कर्मचा-यांने संगणक अर्हता परिक्षा उतीर्ण असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास ते ग्राहय धरणेत येईल. नसल्यास, शासन निर्णय सा.प्र.वि. क्र. प्रशिक्षण 2000 / प्र.क्र. 61/2001 /39 दिनांक 19 मार्च,2003 अन्वये संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून 02 वर्षाच्या प्राप्त करणे आवश्यक राहिल.

3. माध्यमिक शालांत परिक्षेत मराठी / हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील

**- <u>परीक्षेचे स्वरूप व निवड पध्दती</u> -**

| अ.क्र. | संवर्ग | परिक्षेसाठी गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | **लेखी परिक्षा** | **मौखिक परीक्षा** | **एकूण गुण** |
| 01 | लिपीक - टंकलेखक | 100 प्रश्न (प्रत्येकी 02 गुण) | --- | 200 |
| 02 | तलाठी | 100 प्रश्न (प्रत्येकी 02 गुण) | --- | 200 |

A) लिपीक टंकलेखक संवर्गातील पात्र उमेदवारांना शासन निर्णय दिनांक 19.10.2007 नुसार परिक्षेचा दर्जा कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता 10 वी) आहे. अशा पदांकरीता महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी 50 गुण ठेवून एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

B) तलाठी पदांकरीता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे. अशा पदांकरीता शासन निर्णय प्रानिम- 2007/प्र.क्र. 46/07/13 - अ, दिनांक 19.10.2007 मधील तरतुदीनुसार परिक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विदयापिठांच्या पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहिल.परंतू, मराठी संबंधीत प्रश्नांचा

दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता 12 वी ) दर्जाच्या समान राहिल व लेखी परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नाकरीता प्रत्येकी 50 गुण ठेवून एकूण 200 गुणांची लेखी परिक्षा घेणेत येईल.

C) लिपीक टंकलेखक व तलाठी या दोन्ही पदांकरीता घेणेत येणा-या परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.

D) शासन निर्णय दिनांक 19.10.2007 नुसार लिपीक टंकलेखक या पदाकरीता मौखिक परीक्षा घेण्यात येणार नसून फक्त लेखी परिक्षेच्या गुणांच्या आधारे मेरिट यादी / गुणवत्ता यादी तयार केली जाईल. तसेच, वैद्यकीय चाचणीस अधीन राहून पात्र उमेदवारांना नेमणूक आदेश सक्षम अधिका-यांकडून निर्गमित होतील.

E) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिम 2009/प्र.क्र. 356/ई-10 दिनांक 01.01.2010 नुसार तलाठी पदासाठी मौखिक चाचणी (Interview) घेण्यात येणार नाही. फक्त लेखी परिक्षेच्या गुणांच्या आधारे निवड यादी तयार करणेत येवून वैद्यकीय चाचणीस अधीन राहून पात्र उमेदवारांना नेमणूक आदेश सक्षम अधिका-यांकडून निर्गमित होतील.

F) निवडसूचीची कालमर्यादा सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिम/2007 /प्र.क्र.46/7/13/अ दिनांक 19.10.2007 व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिम/2007/प्र.क्र.46/7/13/अ 27 जुन 2008 मधील निर्णयानुसार राहिल.

G) गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकुण गुणांच्या किमान 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

H) एकाच स्थानासाठी (position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. प्रानिमं - 1215/(प्र.क्र.55/15)/13-अ दिनांक 05 ऑक्टोंबर, 2015 मधील निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

**ड) <u>सर्वसाधारण अटी व शर्तीः</u> -**

**1)** (अ) शासन निर्णय क्रं. रिपभ/प्र.क्र.66/2011/ई-10 दिनांक 27 जुन 2011 नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (domicile certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला ( birth certificate ) सादर करणे आवश्यक आहे.

(ब) सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु, सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यांमध्ये त्या परीक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

(क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परीक्षार्थींसाठी लागू राहतील
इतर परिक्षार्थी / उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (domicile certificate) आवश्यक राहील.

**2)** उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

**3)** प्राथमिक छाननीअंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आलेले नाहीत, अशा उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

**4)** आरक्षित मागासप्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (caste certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (caste validity certificate) साक्षांकित प्रत जोडावी.

**5)** सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक 26.03.2010 चे तरतुदीप्रमाणे नियुक्ती पुर्वी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करणेत आलेले होते. त्यानुसार निवड झाले उमेदवाराने 6 महिन्याचे आत वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. तथापि, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक 12.12.2011 अन्वये सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारांस त्याच्या नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत त्यास

जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्याबाबत आदेश निर्गमित करणेत आलेले आहेत. परंतु नियुक्ती प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आंत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून घेणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविलेस त्यास दिलेले नियुक्ती आदेश रद्द करणेत येईल.

**6)** लेखी परीक्षा सांगली जिल्हयातील परीक्षा केंद्रावर घेणेत येईल.

**7)** निवड समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांचेकडे वशिला लावण्याचा अथवा कोणत्याही राजकीय पक्षाचा / व्यक्तीचा दबाव आणल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**8)** लेखी परीक्षेमध्ये फक्त काळया शाईच्या बॉलपेनचा वापर बंधनकारक आहे.

**9)** (अ) भुकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी समक्ष अधिकारी / संबंधित जिल्हाधिकारी अथवा जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकिय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

ब) पदवीधर अंशकालीन, माजी सैनिक या समांतर आरक्षण प्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांनी त्या समांतर आरक्षणात मोडत असलेबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**10)** सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक पअं - 1009/प्र.क्र. 200/2009/16-अ दिनांक 27.10.2009 अन्वये सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनांवर काम केल्याबाबतचे साक्षांकित प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेबाबतचे साक्षांकित प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**11)** अंशकालीन उमेदवारांच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक पअंक-1914/प्र.क्र. 12/16-अ दिनांक 11 एप्रिल 2014 मधील तरतूदी लागू राहतील.

**12)** सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील पत्र क्रं. पअं - 1010/717/प्र.क्र. 322/10/16-अ दिनांक 26 ऑगस्ट 2010 अन्वये एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुस-या पदावर नोकरी मिळविण्यासाठी त्यांस समांतर आरक्षणाचा लाभ देणे हे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारांस पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

**13)** सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्रं. एसआरव्ही-2000/प्र.क्र. 17/2010/12 दिनांक 28.03.2005 व शासन परिपत्रक क्रं. एसआरव्ही-2000/प्र.क्र. 17/2000/12 दिनांक 01.07.2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28.03.2005 नुसार रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या बाबत लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणा-या अर्जदारांनीही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे.

**14)** मागासवर्गीय अर्जदारांनी कोणत्याही प्रवर्गातून अर्ज केला तरीही सक्षम प्राधिका-यांचे जात प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. आणि असल्यास जात वैधता प्रमाणपत्र जोडावे.

**15)** विहित वयोमर्यादेतील शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अर्जामध्ये सध्या कार्यरत असलेले पद व कार्यालयाचा पत्ता नमूद करावा. अर्जासोबत संबंधित विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करावे.

**16)** विवाहीत महिलांनी त्यांच्या विवाहनंतरच्या नावांने अर्ज करावा. कागदपत्र पडताळणीवेळी विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत / नावात बदलाबाबतचे शासन राजपत्र अथवा विवाहापूर्वीचे नांव व विवाहानंतरचे नांवाबाबत रू.100/- च्या बॉन्ड पेपरवर दोन्ही नावाची एकच व्यक्ती असल्याचे प्रतिज्ञापत्र जोडावे.

**17)** उमेदवाराने लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे अंतरिम निवडयादी तयार केली जाईल.

**18)** अंतिम निवड झालेल्या अर्जदारांना त्यांच्या नियुक्तीचा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 7 दिवसाच्या आत आदेशीत कार्यालयातील पदावर रूजू व्हावे लागेल. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द होणेस पात्र राहिल व ते पुढील नियुक्तीस अपात्र ठरतील. त्यांचे ऐवजी निवडसूचीतील प्रतिक्षा यादीनुसार पुढील पात्र अर्जदारास नियुक्ती दिली जाईल.

**19)**मुळ प्रमाणपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या अर्जदारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजू करून घेण्यात येईल.

**20)**शैक्षणिक अर्हता, वय अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, अर्जदार (अ.ज./अ.जा. उमेदवार वगळून) इतर मागासवर्गियासाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत दिनांक 31 मार्च, 2017 अखेर वैध असलेले सक्षम अधिका-याने वितरीत केलेले (Non - Cremy- Layer Certificate ) इत्यादी प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. साक्षांकित प्रती या राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्टर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेल्या असाव्यात. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास उमेदवारांस कोणत्याही क्षणी अपात्र ठरविणेत येईल.

**21)**शासनाचे महिला व बाल कल्याण विभागाकडील निर्णय क्रं. 82/2011/मसेआ-2000/प्र.क्र 415/2 दिनांक 25.05.2001 अन्वये खुला, इ.मा.व., वि.जा.(अ), भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड. व वि. मा. प्र. प्रवर्गातील महिला उमेदवारांना महिलासाठी राखीव पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास त्यांनी दिनांक 31 मार्च, 2017 अखेर वैध असलेले सक्षम अधिका-याने वितरीत केलेले नॉन क्रिमीलेअर दाखला सादर करणे आवश्यक राहील. महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूकी करिता ज्या महिलांची शिफारस होईल व त्यांची प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदाकरिता केलेला अर्ज संबंधित विभागाने / कार्यालयांनी आयुक्त, महिला व बालविकास, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून तपासणी झालेनंतर नियुक्ती देणेत येईल.

**22)**अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहिल. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकणेस पात्र राहील व भा. दं. वि. संहिताचे कलम 199 व 200 (2) प्रमाणे कारवाईस पात्र राहिल.

**23)**शासननिर्णय शालेय व क्रिडाविभाग क्र.राक्रिधो-2002/प्र.क्र.68/क्रियुसे-2, दिनांक 30.4.2005 मधील तरतुदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील खेळांचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे असावे. खेळाडूंच्या आरक्षित पदावरील नेमणूक वर नमूद दिनांक 30.04.2005 मधील शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 16 व 17 च्या अधिन राहून देणेत येईल.

**24)**माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावे लागेल.

**25)**महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्तजाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियमक्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), आणि भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक 31 मार्च, 2017 या दिनांकापर्यंत वैध असलेले (नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**26)**विहित वयोमर्यादेतील शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे छाननीवेळी सादर करावी.

**27)**सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 28 मार्च 2005 व शासन परिपत्रक एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 01 जुलै 2005 नुसार विहित केलेल्या नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना(अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र बंधनकारक आहे.

**28)**अनुभवाच्या बाबतीत मासिक नियतकालीक, अंशकालीक, विदयावेतन, अंशदानात्मक, विनावेतन, तत्वावर केलेला अंशकालीक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्याभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

29)ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

30)निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी नियुक्ती रद्द करण्यांत येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल

31)शासन वित्तविभाग निर्णय क्रं.अनियो /10/05/126/सेवा 4/दिनांक 31/10/2005 नुसार दि. 1 नोव्हेंबर 2005 रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवाराचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व म.ना.से. (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

32)परीक्षेस, कागदपत्र पडताळणी इ. करिता अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

33)निवड प्रक्रीया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीच्या क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड / नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व तो उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र होईल.

**इ) विशेष सुचनाः -**

1) भरतीबाबत कोणतीही न्यायालयीन प्रक्रिया सुरू झालेस याबाबत न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून सदर पदे भरणेची कार्यवाही करणेत येईल.

2) निवड प्रक्रिया पुर्ण झालेनंतर 60 दिवसांचे कालावधीनंतर प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका नष्ट केल्या जातील.

**ई) ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत**

1. प्रत्यक्ष अर्ज करण्यापुर्वी या पदांबाबतची विस्तृत जाहिरातीचे वाचन करुन त्यातील अटी व शर्ती पडताळून पाहाव्यात. सदर विस्तृत जाहीरात **http://sanglicollector.maharecruitment.co.in** वर उपलब्ध आहे.

2. **http://sanglicollector.maharecruitment.co.in** या संकेत स्थळावर ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या Link वर किंवा Apply Online Here या Link वर Click करा व पद निवडा आणि पुढील माहिती भरुन Save & Proceed या link वर Click करा.

3. त्यानंतर Online Registration या Screen वरील सर्व माहीती भरा व Submit बटन वर Click करा.

4. त्यानंतर You Are Registered Successfully हा Screen येईल. त्यामध्ये आपला User Name व Password दिसेल.त्याची आपणास Print घेता येईल. व आपल्या नोंदविलेल्या भ्रमणध्वनीवर SMS येईल. तो पुढील कार्यवाहीसाठी जतन करुन ठेवावा. आपणास प्राप्त झालेला User Name व Password सुरक्षित ठेवणेची जबाबदारी आपली राहील.

5. त्यानंतर Click To Proceed केलेनंतर आपणांस SBI चलनाचा Screen दिसेल. त्यावरील Print/Download Challan या Option वर Click केलेनंतर आपणांस SBI चे चलन प्रत दोन प्रतीत दिसेल. ते आपल्याला Print करता येईल व Download ही करता येईल. SBI चलन प्रिंट घेवून SBI बँकेच्या कोणत्याही शाखेत रोखीने भरणा करण्यात यावा. व चलनाची प्रत आपणाकडे जतन करुन ठेवावी व पुढील कामकाजाच्या दिवशी आपला अर्ज

http://sanglicollector.maharecruitment.co.in या संकेत स्थळावर जावून पुर्ण करता येईल.

6. अर्ज फी बँकेत भरणा केलेच्या दुस-या दिवसानंतर http://sanglicollector.maharecruitment.co.in या संकेत स्थळवर जावून आपणास दिलेल्या User Name व Password टाकलेनंतर आपणांस Personal Information हा Screen दिसेल. सदर Screen वरील रिक्त जागी आपली उर्वरीत माहीती भरुन Submit & Proceed या बटणवर Click करा.
7. त्यानंतर Reservation Details हा Screen येईल. सदर Screen वरील माहिती भरुन Submit & Proceed या बटणवर Click करा.
8. त्यानंतर Education Details हा Screen येईल सदर Screen वरील माहिती भरुन Add या बटणावर Click करा. संबंधीत माहिती त्याखाली Add होईल. सदरची माहिती योग्य असल्याची खात्री करुन Proceed या बटणावर Click करा.
9. त्यानंतर Employment Details हा Screen येईल. सदर Screen वरील माहिती भरुन Add करा. व नंतर Proceed या बटणवर Click करा.
10. त्यानंतर Upload Photo & Signature हा Screen येईल. सदर Screen वर खालीलप्रमाणे आपला फोटो व स्वाक्षरी अपलोड करा.

| तपशील | Size Limit | Details |
|---|---|---|
| अर्जदाराचे अलिकडील पासपोर्ट आकाराचे छायचित्र (Recent Photograph ) | JPEG FORMAT मधील 100 **KB** पेक्षा जास्त नसावी | • लाबी /रुंदी प्रमाण 35 X 45 मिमी. असावे<br>• छायाचित्र समोर चेहरा असलेले असावे.<br>• छायाचित्राचा 75% भाग चेहरा असावा<br>• छायाचित्र नजीकचे व स्पष्ट असावे. |
| अर्जदाराची स्वाक्षरी | JPEG FORMAT मधील | • को-या कागदावर गडद/जाड पॉईटच्या पेनने केलेली असावी.<br>• स्वाक्षरी स्पष्ट असावी व लाबी /रुंदी प्रमाण 15 X 35 मिमी. असावी.<br>• रुलींग पेपर अथवा स्वाक्षरी व्यतिरीक्त इतर बाबी असलेल्या कागदाचा उपयोग करु नये. |

11. आपला फोटो व स्वाक्षरी अपलोड केलेनंतर Proceed या बटणावर Click करा.

12. त्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र - अ व प्रतिज्ञापत्रामधील अटी व शर्ती मान्य असलेबाबत होय मान्य आहे या बटणावर Click करा. व त्यानंतर Submit & Proceed या बटणवर Click करा.

13. तद्नंतर आपला भरणेत आलेला परिपुर्ण अर्ज फोटो व स्वाक्षरीसह Screen वर दिसेल. सदरच्या फॉर्मची प्रिंट घेता येईल व Save ही करता येईल. त्यानंतर Exit या बटणावर Click केलेनंतर आपला अर्ज पुर्ण होईल.

14. उमेदवाराची Photo व सही व्यतिरीक्त कोणत्याही प्रमाणपत्र/अभिलेख्यांची Soft Copy अर्ज भरताना (Upload करण्याची) आवश्यकता नाही.

15. तयार झालेला User Name & Password भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेत उपयुक्त असल्याने, तो उमेदवारांनी सांभाळून / नोंद करुन ठेवावा. यानंतर अर्जात भरलेली माहिती उमेदवारास बदलता येणार नाही.

16. उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वित असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व इमेल आयडी नमूद करावा. जेणेकरून आपणांस संपर्क करून आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

17. अर्जाचे वेळापत्रक -

| अ.क्र. | तपशिल | कालावधी (दिनांक) | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| 1 | ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | 13.08.2016 | 20.08.2016 |
| 2 | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखांमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | 14.08.2016 | 20.08.2016 |
| 3 | ज्यांचे अर्ज दिनांक 20.08.2016 रोजी दाखल झाले आहेत व ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दिनांक 20.08.2016 पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत. | 23.08.2016 | |
| 4 | परिक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दिनांक 25.08.2016 सकाळी 11.00 वाजलेपासून. | |

18. माहिती भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वत: काढावी. ती आपल्या माहितीसाठी जतन करून ठेवावी. अर्जदाराने नियमितपणे संकेतस्थळाला भेट द्यावी. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रत प्रिंट काढून जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे पाठविण्याची आवश्यकता नाही.

19. पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परिक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणा-या परिक्षेची रूपारेषा, वेळापत्रक, प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ.बाबतची माहिती **http://sanglicollector.maharecruitment.co.in** या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

20. ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क मुदतीत अदा केलेले आहे. व संपूर्ण माहिती भरून प्रिंट काढलेली आहे. त्यांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र (हॉलतिकीट) त्यांच्या लॉग इन आयडीव्दारे वरील नमूद संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येईल. यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

21. परिक्षा केंद्रावर ओळखपत्रांसह परिक्षा सुरू होण्यापूर्वी 01 तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिरा येणा-या व प्रवेशपत्र न आणणा-या उमेदवारांना परिक्षेकरिता प्रवेश दिला जाणार नाही. तसेच उमेदवारांनी स्वत:चे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र इ. सोबत आणणे बंधनकारक राहिल.

22. उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यास काही अडचण आल्यास त्यांनी **7558568409** या क्रमांकावर संपर्क साधावा.

23. जिल्हाधिकारी सांगली व सह.जिल्हा निबंधक वर्ग 1, सांगली यांचे आस्थापनेवरील लिपीक - टंकलेखक तसेच अधिनस्त उपविभागीय अधिकारी यांचे आस्थापनेवरील तलाठी पदभरती परिक्षेचा दिनांक व वेळ कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्ग | परिक्षेचा दिनांक | परिक्षेची वेळ |
|---|---|---|---|
| 1 | लिपीक - टंकलेखक | 04.09.2016 | सकाळी 11.00 ते 01.00 |
| 2 | तलाठी | 11.09.2016 | सकाळी 11.00 ते 01.00 |

24. **परीक्षा शुल्क** - सदर भरती प्रक्रियेत खालील प्रमाणे परिक्षा शुल्क आकारले जाणार असून सदर परिक्षाशुल्क हे नापरतावा राहिल.

<table>
<tr><td rowspan="2">अ. क्र.</td><td rowspan="2">पदाचे नाव</td><td colspan="2">परिक्षा शुल्क</td><td rowspan="2">अधिक रक्कम Commission Processing Charges</td></tr>
<tr><td>खुल्या प्रवर्गातील उमेदवार</td><td>मागासप्रवर्गातील उमेदवार</td></tr>
<tr><td rowspan="2">1</td><td rowspan="2">लिपीक - टंकलेखक व तलाठी</td><td>600/-<br>(अक्षरी सहाशे रुपये फक्त)</td><td>300/-<br>(अक्षरी तीनशे रुपये फक्त)</td><td>60/-<br>(अक्षरी साठ रुपये फक्त)</td></tr>
<tr><td colspan="3">माजी सैनिक - परिक्षा शुल्क लागू नाही. तथापि त्यासाठी त्यांनी सैनिक सेवेचा पदावधी पुर्ण केल्याबाबतच्या कार्यमुक्त पत्राची साक्षांकित प्रत स्कॅन करून ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक आहे. सदर कार्यमुक्त पत्राची प्रत सादर न केल्यास वर नमूद केल्याप्रमाणे परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहिल.</td></tr>
</table>

**विशेष सूचना:-** अधिक माहितीसाठी **http://sanglicollector.maharecruitment.co.in** हे संकेतस्थळ दिनांक 13.08.2016 पासून कार्यरत होईल. तसेच सदरची जाहिरात www.sangli.nic.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

**सही /-xxx**
**(शेखर गायकवाड)**
**अध्यक्ष,जिल्हा निवड समिती तथा,**
**जिल्हाधिकारी, सांगली**